महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विशेष कार्यक्रम अधिकारी - मग्रारोहयो (Special Programme Officer - MGNREGA) पदे निर्माण करण्याबाबत........

# महाराष्ट्र शासन
## नियोजन विभाग
## शासन निर्णय क्रमांकः आस्थाप २०१३/प्र.क्र.२१/मग्रारो-३

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० जून, २०१३.

**वाचा :**

१) शासन परिपत्रक नियोजन विभाग क्रमांक : मग्रारोहयो २०१०/प्र.क्र.१२/रोहयो-१४, दि. ११.११.२०१०.
२) शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक : आकृति-२०११/प्र.क्र.५/मग्रारो-३, दि. ३१.५.२०११.
३) शासन शुध्दिपत्रक नियोजन विभाग क्रमांक :आकृति-२०११/प्र.क्र.५/मग्रारो-३, दि. २२.६.२०११.
४) शासन शुध्दिपत्रक नियोजन विभाग क्रमांक :आकृति-२०११/प्र.क्र.५/मग्रारो-३, दि. १८.७.२०११.
५) शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक :आकृति-२०१०/प्र.क्र.७३/मग्रारो-३, दि. १५.९.२०११.
६) शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक : आस्थाप - २०१३/प्र.क्र.३/मग्रारो-३, दि. २४.५.२०१३.

**प्रस्तावना:-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ या कायद्याची अंमलबजावणी दिनांक २.२.२००६ पासून टप्प्याटप्प्याने सुरु करुन दिनांक १.४.२००८ पासून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार, या योजनेंतर्गत किमान ५०% कामे ग्रामपंचायतीमार्फत करावयाची असून उर्वरित कामे सार्वजनिक बांधकाम विभाग, लघुसिंचन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, वन विभाग, कृषि विभाग अशा यंत्रणांमार्फत करावयाची आहेत. यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय व तालुका स्तरावर दिनांक ३१.५.२०११ च्या शासन निर्णयान्वये १०४९ पदांच्या सुधारीत आकृतिबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच या योजनेचे राज्य स्तरावरील संनियंत्रणाचे काम अधिक कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी दिनांक १५.९.२०११ च्या शासन निर्णयान्वये नागपूर येथे मुख्यालय असलेले स्वतंत्र महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र आयुक्तालय स्थापन करण्यात आलेले आहे. त्यासाठी १७ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त या योजनेच्या प्रभावी

अंमलबजावणीसाठी दिनांक २४.५.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय व आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र कार्यालयांच्या आस्थापनेवरील काही पदे निरसित करुन त्याऐवजी काही पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियमांतर्गत योजनेच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटी तत्वावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे अनुज्ञेय आहे. ही बाब विचारात घेऊन तहसिल व पंचायत समिती कार्यालयातील मग्रारोहयोशी संबंधित कामकाजात मदत करण्यासाठी एकत्रित वेतनावर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. सदर प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची राज्यात मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी सुरु आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात मोठया प्रमाणात वाढ झाल्यामुळे तालुका स्तरावर अंमलबजावणी करताना क्षेत्रिय यंत्रणांवरील कामाचा ताणसुध्दा मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे व दिवसेंदिवस योजनेचा विस्तार वाढत आहे. परिणामी, तालुका स्तरावर फक्त अव्वल कारकून हे एकच पद मंजूर असल्याने तालुकास्तरावर अतिरिक्त अधिकाऱ्याचे नियमित स्वरुपात पद निर्माण करण्याची मागणी शासनाकडे गेल्या दोन वर्षापासून करण्यात येत आहे. राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मग्रारोहयोच्या बळकटीकरणासाठी स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीगटाची शिफारस विचारात घेऊन मग्रारोहयोबाबत तातडीने निर्णय घेण्यासाठी स्थापन केलेल्या मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील टास्क फोर्स समितीच्या दिनांक ६.१२.२०१२ रोजी झालेल्या बैठकीत तालुका/पंचायत समिती पातळीवर मग्रारोहयो करीता विशेष कार्यक्रम अधिकारी पद निर्माण करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने सादर केलेल्या प्रस्तावास वित्त विभागाने गठित केलेल्या उच्चाधिकार समितीने मान्यता दिलेली असल्याने विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer - MGNREGA) यांची, नायब तहसिलदार, गट-ब या संवर्गातील पदास समकक्ष, ७५ पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत राज्यामध्ये ज्या तालुका / पंचायत समित्यांमध्ये जास्त प्रमाणात कामे चालू आहेत व जास्तीत जास्त मजूर उपस्थिती आहे अशा ७५ तालुक्यांमध्ये "विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो" (Special Programme Officer-MGNREGA) यांची नायब तहसिलदार गट-ब या संवर्गातील ७५ पदे निर्माण करण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर पदे अस्थायी स्वरुपाची असून ती तदर्थ तत्त्वावर (Adhoc Basis) प्रथमत: तीन वर्षासाठी निर्माण करण्यात येत आहेत. या पदाची मुदत दिनांक ३०.६.२०१६ पर्यंत असेल. विशेष कार्यक्रम अधिकारी - मग्रारोहयो (Special Programme Officer - MGNREGA) या पदांची वेतनश्रेणी रु. ९३००-३४८००- ग्रेड पे - रु.४३०० अशी असेल. तसेच या पदास वेळोवेळी देय होणारे शासनाचे इतर भत्ते अनुज्ञेय असतील. **यावरील होणारा खर्च केंद्र शासनाकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी प्रशासकीय खर्चासाठी अनुज्ञेय असलेल्या ६% निधीतून संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांकडून भागविण्यात येईल.**

२. विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer - MGNREGA) ही पदे खालील नमूद केल्याप्रमाणे महसूली विभागानुसार निर्माण करण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | महसूली विभाग | आवश्यक पदे |
|---|---|---|
| १ | कोकण | ०७ |
| २ | नाशिक | ११ |
| ३ | पुणे | १० |
| ४ | औरंगाबाद | १८ |
| ५ | अमरावती | १३ |
| ६ | नागपूर | १६ |
| | **एकूण** | **७५** |

३. रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७ अन्वये सदर योजनेचे विभागीय स्तरावरील पर्यवेक्षणाचे अधिकार विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. ही बाब लक्षात घेता पुढील बाबी विचारात घेऊन **विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो** (Special Programme Officer - MGNREGA) यांची कामाच्या आवश्यकतेनुसार (as per work load) संबंधित तालुक्यांमध्ये / पंचायत समित्यांमध्ये पदे निर्माण व निरसित करण्याचे तसेच नियुक्ती देण्याचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत :-

(अ) विभागातील प्रत्येक जिल्हयात किमान एक विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer-MGNREGA) यांची नियुक्ती करण्यात यावी.

(ब) २०१०-११, २०११- १२ व २०१२-१३ या वित्तीय वर्षातील कामाचा आढावा घेऊन विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer-MGNREGA) यांची नियुक्ती करण्याबाबतचा निर्णय घेण्यात यावा.

(क) आदिवासीबहुल तालुक्यामध्ये/ पंचायत समितीमध्ये जास्तीत काम व तेथे भविष्यात घेण्यात येणारी संभाव्य कामे यांचा सर्वसाकल्याने विचार करुन विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer-MGNREGA) यांची नियुक्ती आदिवासीबहुल तालुक्यामध्ये / पंचायत समितीमध्ये करण्यात यावी.

विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो या पदाची संकल्पना प्रथमच राबविण्यात येत असल्याने, सर्व विभागीय आयुक्तांनी विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांची पदे निर्माण करताना वरील बाबींचा विचार करावा. त्याअनुषंगाने विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer - MGNREGA) यांची **सन २०१३-१४ या वर्षासाठी महसूल विभागनिहाय, जिल्हानिहाय व तालुकानिहाय निर्माण करावयाच्या पदांचा तपशील "प्रपत्र-१" मध्ये दर्शविण्यात आला आहे.** मात्र पुढील वर्षापासून सर्व विभागीय आयुक्तांनी त्यांच्या

विभागातील परिस्थिती विचारात घेऊन विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांच्या नियुक्तीबाबत निर्णय त्यांच्या स्तरावर घ्यावा. विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो पदाच्या आवश्यकतेबाबतचा वार्षिक आढावा संबंधित विभागीय आयुक्त घेतील व आवश्यकतेनुसार सदर पदे इतर तालुक्यांमध्ये / पंचायत समित्यांमध्ये बदली करतील.

४. **विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो** (Special Programme Officer - MGNREGA) **यांचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील सहभाग, कर्तव्ये व जबाबदाऱ्या सदर शासन निर्णयासोबतच्या "प्रपत्र-२" मध्ये दर्शविण्यात आल्या आहेत.**

५. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील. या आदेशामुळे नव्याने निर्माण करण्यात आलेल्या **विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो** (Special Programme Officer-MGNREGA) या पदावरील नायब तहसिलदार संवर्गातील अधिका-यांच्या नियुक्त्या महसूल विभागाने / विभाग प्रमुखांनी तात्काळ कराव्यात. तद्नंतर विभागीय आयुक्तांनी सोबतच्या प्रपत्र-१ नुसार विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांना नियुक्त्या देण्याची कार्यवाही करावी.

६. सदर आदेश वित्त विभागाने गठित केलेल्या उच्चाधिकारी समितीने **दिनांक १७ मे २०१३** च्या टिप्पणीन्वये चक्रीय पध्दतीने दिलेल्या मान्यतेनुसार व महसूल विभागाने नायब तहसिलदार संवर्गातून ७५ पदे निर्माण करण्यास दिलेली मान्यता लक्षात घेऊन निर्गमित करण्यात येत आहेत.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक 201306201615292916 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

वि. गिरिराज

**(व्ही. गिरिराज)**
प्रधान सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) प्रधान सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
४) प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
५) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

६) सर्व विभागीय आयुक्त.

७) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)

८) सर्व उप आयुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय.

९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

१०) सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई शहर व उपनगर वगळून).

११) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.

१२) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.

१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.

१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.

१५) सर्व उप सचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग), मंत्रालय, मुंबई - ३२.

१६) सारसंग्रहासाठी, मग्रारो-१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१७) निवडनस्ती, मग्रारो-३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**शासन निर्णय क्रमांक : आस्थाप २०१३/प्र.क्र.२१/मग्रारो-३, दिनांक २० जून, २०१३ सोबतचे**

**प्रपत्र - १**

**विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer - MGNREGA) यांचा सन २०१३-१४ या वर्षासाठी महसूल विभागनिहाय, जिल्हानिहाय व तालुकानिहाय निर्माण करावयाच्या पदांचा तपशील**

| अ. क्र. | महसूली विभाग | जिल्हा | तालुक्यांचे नाव | निर्माण करावयाच्या पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कोकण विभाग | ठाणे | जव्हार, विक्रमगड, डहाणू, वाडा | ०४ |
| २ | | रायगड | पेण | ०१ |
| ३ | | रत्नागिरी | दापोली | ०१ |
| ४ | | सिंधुदुर्ग | देवगड | ०१ |
| ५ | नाशिक विभाग | नाशिक | पेठ, सिन्नर, सुरगणा | ०३ |
| ६ | | धुळे | धुळे, साक्री | ०२ |
| ७ | | नंदूरबार | अक्राणी, अक्कलकुवा | ०२ |
| ८ | | जळगाव | चाळीसगाव | ०१ |
| ९ | | अहमदनगर | अकोले, पारनेर, पाथर्डी | ०३ |
| १० | पुणे विभाग | पुणे | आंबेगाव, भोर | ०२ |
| ११ | | सातारा | माण, खटाव | ०२ |
| १२ | | सांगली | जत, आटपाडी | ०२ |
| १३ | | सोलापूर | माढा, करमाळा, सांगोला | ०३ |
| १४ | | कोल्हापूर | करवीर | ०१ |
| १५ | औरंगाबाद विभाग | औरंगाबाद | कन्नड, सिल्लोड, वैजापूर | ०३ |
| १६ | | जालना | भोकरदन, परतूर, मंठा | ०३ |
| १७ | | परभणी | जिंतूर | ०१ |
| १८ | | हिंगोली | औंढा नागनाथ, कळमनुरी | ०२ |
| १९ | | बीड | बीड, पाटोदा | ०२ |
| २० | | नांदेड | कंधार, लोहा, मुखेड, किनवट | ०४ |
| २१ | | उस्मानाबाद | कळंब, परांडा | ०२ |
| २२ | | लातूर | औसा | ०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | **अमरावती विभाग** | अमरावती | चिखलदरा, धारणी, मोर्शी, अचलपूर | ०४ |
| २४ | | अकोला | पातूर | ०१ |
| २५ | | वाशिम | रिसोड, मंगरुळपीर | ०२ |
| २६ | | बुलडाणा | लोणार, संग्रामपूर, सिंदखेडराजा | ०३ |
| २७ | | यवतमाळ | कळंब, घाटंजी, बाभुळगाव | ०३ |
| २८ | **नागपूर विभाग** | नागपूर | काटोल | ०१ |
| २९ | | वर्धा | कारंजा | ०१ |
| ३० | | भंडारा | मोहाडी, तुमसर, लाखणी, भंडारा | ०४ |
| ३१ | | गोदिया | तिरोडा, देवरी, सडक अर्जुनी | ०३ |
| ३२ | | चंद्रपूर | ब्रम्हपुरी, नागभीड, चिमूर | ०३ |
| ३३ | | गडचिरोली | कुरखेडा, चामोर्शी, कोरची, आरमोरी | ०४ |
| **एकूण** | | | | ७५ |

*********************

**शासन निर्णय क्रमांक : आस्थाप २०१३/प्र.क्र.२१/मग्रारो-३, दिनांक २० जून, २०१३ सोबतचे**

**प्रपत्र - २**

**विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer - MGNREGA) यांचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील सहभाग, कर्तव्ये व जबाबदाऱ्या**

(१) ज्या तालुक्यांमध्ये / पंचायत समित्यांमध्ये विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer - MGNREGA) हे पद निर्माण करण्यात येणार आहे त्या तालुक्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची सर्व कामे या कार्यालयामार्फत हाताळण्यात येतील. या कार्यालयास **"विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो कार्यालय"** असे संबोधण्यात येईल.

(२) विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो कार्यालयाचे जास्तीत जास्त कामकाज पंचायत समितीशी संलग्न असल्याने हे कार्यालय पंचायत समितीच्या जवळपास असणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कार्यालय पंचायत समिती कार्यालयातील स्वतंत्र जागेत/ दालनात किंवा पंचायत समिती कार्यालयाजवळील भाडयाच्या जागेत असेल व तशा प्रकारचा फलक कार्यालयाबाहेर लावण्यात येईल. विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो कार्यालय भाडयाच्या जागेत असेल तर भाडयासाठी होणारा खर्च केंद्र शासनाकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत उपलब्ध होणा-या निधीपैकी प्रशासकीय खर्चासाठी अनुज्ञेय असलेल्या ६% निधीतून भागविण्यात येईल.

(३) विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो कार्यालयाचे प्रमुख "विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो" असतील. विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो कार्यालयासाठी तहसिल कार्यालयातील अव्वल कारकून (रोहयो) तसेच तहसिल व पंचायत समिती कार्यालयातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त केलेला सर्व कंत्राटी कर्मचारी (उदा. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक अधिकारी व क्लर्क कम डेटा एन्ट्री ऑपरेटर) विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer-MGNREGA) यांच्या पर्यवेक्षण व मार्गदर्शनानुसार कार्यरत राहिल. त्यामुळे सर्व कर्मचा-यांचे व्यवस्थापन उत्कृष्टरित्या करता येईल. तसेच सर्व संगणक व त्यावरील MIS नोंदी उक्त कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील.

(४) विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer - MGNREGA) हे पद फक्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी संबंधित असल्याने **सदर पदावरील अधिका-यास उक्त योजनेव्यतिरिक्त अन्य कामे सोपविण्यात येऊ नयेंत**. या अधिका-यांच्या सेवा मग्रारोहयो व्यतिरिक्त इतर

अपरिहार्य प्रयोजनार्थ जिल्हा प्रशासनाला आवश्यक असल्यास त्याकरिता रोहयो विभागाची पूर्वसंमती घेणे अनिवार्य राहील.

(५) प्रचलित नियमानुसार विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांचे रजा/वेतन इत्यादी मंजुरीचे अधिकार वर्ग १ चे गटविकास अधिकारी यांना राहतील. जिथे गटविकास अधिकारी यांचे वर्ग-१ चे पद नसेल अशावेळी सदरचे अधिकार उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांना असतील.

(६) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार पुर्वीप्रमाणेच तहसिलदार (इतर यंत्रणा) व गट विकास अधिकारी (ग्रामपंचायत स्तरावरील कामे) यांचेकडे कायम राहतील. विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो हे त्याप्रमाणे संबंधित अधिका-यांकडून प्रशासकीय मान्यता मिळविण्याचे काम करतील.

(७) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे (ग्रामसभा व ग्रामपंचायत ठराव, जॉब कार्ड, बँक अथवा पोस्टाव्दारे मजुरी अदा करणे, कंत्राटदारामार्फत कामे न करणे, विहित मुदतीत मजुरी अदा करणे इ.) काटेकोररित्या पालन करण्याची जबाबदारी विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांची राहील.

(८) **अहवाल सादर करणे :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार मजुरांची नोंदणी, जॉब कार्ड वितरीत करणे व इतर कामकाज ग्रामपंचायतींशी संबंधित आहे. तसेच सदर योजनेचा जवळपास ७०% खर्च हा ग्रामपंचायतींकडून करण्यात येत असल्याने, विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो हा प्रथम गटविकास अधिकारी यांना आपला अहवाल सादर करील. तसेच यंत्रणेशी संबंधित कामांसाठी तो तहसिलदार यांना आपला अहवाल सादर करील. अशाप्रकारे विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो हा पूर्णवेळ तहसिलदार व गटविकास अधिकारी यांना त्यांच्या अनुक्रमे कार्यक्रम अधिकारी व सह कार्यक्रम अधिकारी पदाच्या कामात मदत करील. मात्र कार्यक्रम अधिकारी व सह कार्यक्रम अधिकारी पदाच्या सर्व जबाबदा-या तहसिलदार व गटविकास यांच्यावरच राहतील.

(९) **फाईल सादर करण्याचे टप्पे :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या संदर्भात तहसिलदार व गटविकास अधिकारी यांना सादर करण्यात येणारी प्रकरणे विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो मार्फत सादर करण्यात येतील.

(१०) <u>अधिकारांचे प्रत्यायोजन</u> (Delegation of Powers)

तहसिलदार व गटविकास अधिकारी यांच्याकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी संबंधित नेहमीच्या कामांबरोबर पुढील कामांबाबतच्या अधिकारांचे प्रत्यायोजन विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांना करण्यात येईल. जेणेकरुन तहसिलदार व गटविकास अधिकारी यांचा वेळ वाचून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात गतीमानता येईल:-

- **हजेरी प्रमाणे मजुरीची रक्कम वितरीत करणे.**
- **कुशल (साधनसामुग्री) कामाची रक्कम वितरीत करणे.**
- **ग्राम रोजगार सेवकांचे मानधन व इतर नियमित प्रशासकीय रक्कमेचे वितरण करणे.**
- **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी संबंधित सर्व नोंदवहया, अभिलेख, मोजमाप वही इत्यादींची तपासणी करणे.**
- **पुढे दिलेल्या सूचनांप्रमाणे स्वाक्षरीकर्ता म्हणून धनादेशावर स्वाक्षरी करुन रक्कम अदा करणे.**
- **कामाची नियमित तपासणी करणे.**

(११) विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांना अधिकारांचे प्रत्यायोजन करताना, तहसिलदार व गटविकास अधिका-यांच्या, खालील महत्त्वाच्या जबाबदाऱ्या व <u>त्यानुषंगानेच्या अधिकारांचे प्रत्यायोजन करण्यात येऊ नये</u> :-

- **नवीन कामांना प्रशासकीय मंजूरी देणे.**
- **कार्यारंभ आदेश काढणे.**
- **मासिक आढावा / पुनर्विलोकन, शेल्फ वरील कामांचे नियोजन, तालुका स्तरावरील तालुका कृषी अधिकारी, वन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभागातील अधिकारी यांसारख्या उच्चस्तरीय अधिका-यांच्या समन्वयाचे काम.**
- **सर्व कामांचे नियोजन, लेबर बजेट व तक्रारी.**

(१२) पंचायत समिती कार्यालय व तहसिल कार्यालय येथील मजुरी व इतर खर्च तसेच प्रशासकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी धनादेशावर स्वाक्षरी करण्यासाठी असलेल्या तरतूदीत पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | सध्याची तरतूद | विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो कार्यरत असलेल्या ठिकाणी नवीन व्यवस्था | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | पंचायत समिती कार्यालय | धनादेशावर गटविकास अधिकारी व उपलेखापाल यांची संयुक्त स्वाक्षरी | विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांचे नाव बँकेच्या खात्यावर स्वाक्षरीकर्ता म्हणून नोंदविण्यात यावे. त्यानंतर गटविकास अधिकारी, विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो व उपलेखापाल या तिघांपैकी कोणीही दोघांच्या स्वाक्ष-या धनादेशावर करण्यात याव्यात. | गटविकास अधिका-यांचा वेळ वाचण्यासाठी नेहमीच्या कामांच्या रक्कमेच्या वितरणासाठी धनादेशांवर विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो व उपलेखापाल यांनी सर्वसाधारणपणे स्वाक्षरी करावी. |
| २ | तहसिलदार कार्यालय | धनादेशावर तहसिलदारांची स्वाक्षरी अथवा काही ठिकाणी तहसिलदार व इतर अधिकारी / कर्मचारी जसे नायब तहसिलदार/ अव्वल कारकून यांची संयुक्त स्वाक्षरी | विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांचे नाव बँकेच्या खात्यावर स्वाक्षरीकर्ता म्हणून नोंदविण्यात यावे. त्यानंतर विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो आणि अव्वल कारकून अथवा विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो आणि तहसिलदार यांच्या संयुक्त स्वाक्षरीने धनादेश निर्गमित करण्यात यावेत. | तहसिलदारांचा वेळ वाचण्यासाठी नेहमीच्या कामांच्या रक्कमेच्या वितरणासाठी धनादेशांवर विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो व अव्वल कारकून यांनी सर्वसाधारणपणे स्वाक्षरी करावी. |

(१३) **इतर अधिकारी व कंत्राटी कर्मचा-यांनी अहवाल सादर करणे :-**

विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांचे काम प्रभावीपणे होण्यासाठी, विस्तार अधिकारी व ग्रामसेवकांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी संबंधित सर्व कामांचा अहवाल विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांच्यामार्फत गटविकास अधिकारी यांना सादर करावा. त्याप्रमाणेच यंत्रणेच्या सर्व अभिकरणांनी (Agencies) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेशी संबंधित सर्व कामांचा अहवाल विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांच्यामार्फत तहसिलदार यांना सादर करावा. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व तांत्रिक अधिकारी यांनी त्यांच्या कामाचा अहवाल विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांना सादर करावा.

(१४) **गटविकास अधिकारी व तहसिलदार यांचे संपूर्ण सहकार्य विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांना मिळण्याबाबत :-**

पंचायत समितीचे नियमित विस्तार अधिकारी, कनिष्ठ अधिकारी व इतर तांत्रिक कर्मचारी यांचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी संबंधित कामांबाबत संपूर्ण सहकार्य विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांना राहिल. त्यामुळे नेहमीची कामे करण्यास विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांना स्वातंत्र्य राहील व गटविकास अधिकाऱ्यांवरील कामाचा बोजा कमी होईल.

(१५) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सद्य:स्थितीत तहसिलदार व गटविकास अधिकारी यांच्यावर अनुक्रमे कार्यक्रम अधिकारी व सह कार्यक्रम अधिकारी म्हणून सोपविण्यात आलेल्या जबाबदारीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. मात्र विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो हा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामासाठी कार्यक्रम अधिकारी व सह कार्यक्रम अधिकारी यांना पूर्णकालिक अधिकारी म्हणून मदत करील.

(१६) **गोपनीय अभिलेख प्रतिवेदित व पुनर्विलोकित करणे :-**

विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांचे गोपनीय अहवाल वर्ग १ चे गटविकास अधिकारी प्रतिवेदित करतील. ज्या पंचायत समितीमध्ये गटविकास अधिका-यांचे वर्ग २ चे पद भरण्यात आले असेल किंवा प्रभारी गटविकास अधिकारी काम करीत असतील अशा परिस्थितीत विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांचे गोपनीय अभिलेख उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रतिवेदित करतील. मात्र जेव्हा पंचायत समितीमध्ये वर्ग-१ चे गटविकास अधिकारी रूजू होतील, त्या दिवसापासून ते विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांचे गोपनीय अभिलेख प्रतिवेदित करतील. तसेच संबंधित जिल्हाधिकारी हे जिल्हा कार्यक्रम समन्वयक म्हणून पुनर्विलोकन अधिकारी असतील.

**(१७) विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचा सहभाग :-**

विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो या पदाची संकल्पना प्रथमच राबविण्यात येत असल्याने, सुरुवातीस कामकाजाच्या अनुषंगाने काही अडचणी उद्भवू शकतात. त्यामुळे विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी नवीन व्यवस्थेचे कामकाज सुरळीतपणे होण्यासाठी काळजीपूर्वक संनियंत्रण करावे आणि तहसिलदार व गटविकास अधिकारी यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी संबंधित नेहमीच्या कामांबाबतचे त्यांचे अधिकारांचे प्रत्यःयोजन विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो यांना देण्याबाबत योग्य नियोजन करावे व उक्त संकल्पना यशस्वी करुन दाखवावी.

**(१८) विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो पद स्थलांतरीत झाल्यावर उद्भवणारी परिस्थिती :-**

विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो हे पद एक वर्षानंतर एका तालुका/ पंचायत समितीमधून दुस-या तालुका/ पंचायत समितीमध्ये स्थलांतरीत झाल्यावर, ज्या तालुका/ पंचायत समितीमधून सदर पद स्थलांतरीत होईल, तिथे सदरचे पद असण्यापूर्वी असलेली जुनी व्यवस्था पुनरुज्जीवीत करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची दक्षता संबंधित तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी घ्यावी.

**********************